# ग्रामीण साहित्य प्रवाहातील संस्कृती दर्शन

**संगीता नागापा गुरवानगोळ**

मराठी विभाग, के.एल.ई. संस्थेचे, जी. आय. बागेवाडी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, निपाणी.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17260076

## ABSTRACT:

मराठी ग्रामीण साहित्य हा आधुनिक मराठी साहित्यातील एक महत्त्वाचा आणि वास्तववादी प्रवाह आहे, ज्याची सुरुवात १९५० नंतर कथा आणि कादंबरीतून झाली. हे साहित्य ग्रामीण जीवन, तेथील बोलीभाषा, रूढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा आणि कृषी-केंद्रित संस्कृतीचे चित्रण करते. पाटील, बलुतेदार, कारू-नारू यांसारख्या सामाजिक रचनेचे दर्शन घडते.

ग्रामीण कविता (बहिणाबाई), कथा (व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव) आणि कादंबरी (रा. रं. बोराडे, उद्धव शेळके) या प्रकारांमधून शेतकऱ्यांचे कष्टमय जीवन, सामाजिक ताणतणाव, आणि उपेक्षितांच्या व्यथांचे चित्रण झालेले आहे. हे साहित्य केवळ जीवनाचे वास्तववादी दर्शन नसून, ग्रामीण संस्कृतीचे जतन व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे एक सशक्त साधन आहे.

## KEYWORDS:

ग्रामीण साहित्य, ग्रामीण संस्कृती, बोलीभाषा, वास्तववादी चित्रण, रूढी व परंपरा.

## प्रस्तावना:

मराठी ग्रामीण साहित्याची सुरुवात लोकसाहित्य व संत साहित्याच्या पार्श्वभूमीवर होते, पण त्याची आधुनिक वास्तववादी आणि स्वतंत्र ओळख १९५० च्या दशकानंतर कथा साहित्य व कादंबरीतून झालेली आहे. ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य. कविता, कथा, नाटक, कादंबरी अशा साहित्य प्रकारातून मानवी जीवनातील सुख-दुःख, व्यथा, वेदना यांचे चित्रण दिसून येते. रूढी, परंपरा, श्रद्धा आणि अंधश्रद्धा हा ग्रामीण साहित्याचा अविभाज्य अंग म्हणावा लागेल. भारतीय खेड्यांची रचना,

समाजव्यवस्था बघितली तर पुष्कळ बाबी स्पष्ट होत जातील. समाज व्यवस्थेची स्वतःची अशी एक स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण रचना आहे. युगानुयुगापासून चालत आलेल्या या रचनेत माणसे विशिष्ट अशा एका पद्धतीने बांधली जातात. त्याचप्रमाणे खेड्यांचीही एक विशिष्ट अशी रचना ठरलेली असते. आजच्या आधुनिक काळातही खेड्यांमध्ये ती व्यवस्था तशीच टिकून आहे. जसे की, बारा बलुतेदारांचे वास्तव्य कसे असावे, पाटलांचे घर कुठे असावे, मंदिर कुठे असावीत, जात धर्मानुसार राहण्याचा समुदाय आणि त्यावर आधारित सण-वार उत्सव. ग्रामीण संस्कृती ही प्रामुख्याने प्राचीन काळापासून कृषी केंद्रित संस्कृती होती. त्यामुळेच ग्रामीण साहित्यात विशेषकरून शेती, पिके, झाडे, गुरेढोरे, शेळयामेंढ्या, शेतकरी, गुराखी, विहीर, नांगरणी, कुळव, गावचे पाटील, कुणबी, बलुतेदार यांचे प्रामुख्याने चित्रण दिसून येते. या संदर्भात चिं. ना. अत्रे यांनी ग्रामरचनेतील 'कारू-नारू' ची माहिती दिली आहे. पाटील, कुलकर्णी सोडून चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, जोशी, परीट, गुरव, कोळी हे कारू होत; तर तेली, तांबोळी, साळी, धनगर, माळी, गोंधळी, डवरी, घाट, ठकार, गोसावी, जंगम, वाजंत्री, कलावंत, तराळ, भोई इत्यादी हे नारू होत. ग्रामीण संस्कृतीत हे विवेचन अतिशय महत्त्वाचे आहे.

**ग्रामीण कविता:**

ग्रामीण साहित्याची सुरुवात प्रामुख्याने कवितेमधून झाल्याचे दिसून येते. पुढे कथा आणि कादंबरी या वाङ्मय प्रकारातून ग्रामीण जीवनाची चित्रणं येऊ लागले. मराठी साहित्याच्या दालनामध्ये ग्रामीण कवितेला अनन्यसाधारण महत्त्व असून एकूणच मराठी कवितेच्या मागे अनेक शतकांची समृद्ध अशी परंपरा आहे. ज्या कवितेत ग्रामीण जनजीवनाचे चित्रण ग्रामीण संवेदनशीलतेने केलेले असते, तिला ग्रामीण कविता असे म्हणतात. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या अखंडांतील कोळंबीमध्ये कृषी क्षेत्रातील कष्टमय जीवनाची निवेदना टिपलेली आहे. केशवसुतांचा जन्म कोकणातल्या एका निसर्गरम्य खेड्यात झाला. ते निसर्गाच्या सान्निध्यातच लहानाचे मोठे झाले. आपल्या मनातील विविध भावना व्यक्त करताना त्यांनी निसर्ग प्रतिमांचा आधार घेतला आहे. "एक खेडे गोष्टी घराकडील मी वदता गड्या रे" अशा कवितांमधून येणाऱ्या प्रतिमा ह्या सुखावणाऱ्या क्षणांचे आहेत. माधवानुजांनी

दुष्काळ, दगड फोडताना, थंडी इत्यादी कवितांमधून ग्रामीण जीवनाच्या वास्तवाजवळ जाण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. "गेली शेती सुकून सगळी जाहली ठार दैना" अशा मोजक्या शब्दात ग्राम संवेदनेचा अचूक वेध घेणारे वर्णन त्यांच्या दुष्काळ या कवितेतून आले आहे.

बहिणाबाईंच्या काव्यप्रतिभेबाबत आपले विचार प्रकट करताना डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात: "आड रानात मोहरांचा हंडा सापडावा तसा बहिणाबाईंची गाणी हा काव्यसंग्रह पाहून मराठी वाचक हरखून गेला." "अरे संसार संसार" यांसारख्या कवितेमधून साध्या सोप्या शब्दातून खडतर आणि संघर्षमय जीवनाला सामोरे जाण्याचा मंत्र त्यांनी दिला. हिरा बनसोडे यांच्या सखी या कवितेतून आधुनिक भारतातील ग्रामीण भागात अजूनही जातीयतेची मुळे कशी रुजली आहेत याचे दर्शन घडते.

**ग्रामीण कथा वैशिष्ट्ये:**

प्रसिद्ध ग्रामीण कथाकार आनंद यादव यांनी ग्रामीण कथेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे: "ग्रामीण कथेचा केलेल्या दृष्टीने वेगळा असा प्रकार नाही. इतर कथांप्रमाणेच ती एक कथा आहे. ग्रामीण हे तिचे विशेषण आहे. खेड्यातील म्हणजे ग्रामातील जीवनाची अनुभूती म्हणून ती काही खास वेगळी नाही. असे असले तरी खेडेगाव, तेथील जीवन पद्धती, भाषा, रीती, शेती, तेथील निसर्गाशी मातीशी असलेली प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञान विषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या इत्यादी गोष्टीनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्ट्ये त्या कथेत येतात. ती त्या खास ग्रामीण अनुभूतीतून जन्माला येते. तिचे ग्रामीणत्व या व इतर अनेक कारणांनी डोळयात भरते."

या प्रदीर्घ व्याख्येतून ग्रामीण कथेची वैशिष्ट्ये नेमकेपणाने स्पष्ट झाली आहेत. ग्रामीण कथेचा उदय हा हरिभाऊ आपटे यांच्या कथेतून झाला. "काळ तर मोठा कठीण आला" या त्यांच्या कथेत सहानुभूती, करुणा जरी दिसून येत असली तरी, त्यांचे साहित्य म्हणजे ग्रामीण कथेची सुरुवात म्हणावयास हरकत नाही. श्री. म. माटे यांचा उपेक्षितांचे अंतरंग हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आणि ग्रामीण कथेला नवे कोंब फुटले, नव्या जाणिवा पालविल्या. जे दिसले, पाहिले किंवा आपण पाहतो ती वास्तविकता त्यांनी कथेतून मांडली. व्यथा आणि वेदनांनी जगणारा

माणूस, त्यांचे बदललेले मन त्यांनी ग्रामीण साहित्यात उभे केले आहे. व्यंकटेश माडगूळकरांनी “माणदेशी माणसे, गावाकडच्या गोष्टी, हस्ताचा पाऊस, उंबरठा” या त्यांच्या कथासंग्रहातून त्यांनी रखरखता दुष्काळी माणदेश उभा केला. शंकर पाटील यांच्या कथेतून मानवी मन आणि सौंदर्य यांचे सुंदर वर्णन येते ते “आभाळ, ऊन, वळीव” यांसारख्या कथासंग्रहातून, तर धिंडया कथासंग्रहातून ग्रामीण भागातील बोलीभाषा पाहिली असता क्षणभर ती व्यक्ती आपल्यासमोर उभी आहे किंवा आपणच त्या ग्रामभागात असल्याचा अनुभव येतो. द. मा. मिरासदार यांनी ग्रामीण जीवनातील अदृश्यपणे वावरणाऱ्या विनोदाचा धागा मोठ्या कौशल्याने रंगविला. जीवनातील स्वभावातील विसंगती ही विनोदाला कारण ठरते. “व्यंकुची शिकवण, माझ्या बापाची पेंड” इ. त्यांच्या कथासंग्रहातून त्यांनी विनोदी रंजनवादी ग्रामीण कथा लिहिल्याचे दिसून येते. आनंद यादव यांच्या कथेतून अवतरणारा परिसर हा कागल, कोल्हापूरच्या आसपासचा परिसर आहे. त्यातून परिसरातील लोकाचाराचेही दर्शन घडते. उदा. “फाट्याचं पाणी” कथेतील जत्रेचे वर्णन, त्या पंचक्रोशीतील लोकांचे श्रद्धास्थान चित्रित होते. मराठवाड्यातील ग्रामीण कथाकार रा. रं. बोराडे यांनी ग्रामीण समाजातील नात्यागोत्याचे संबंध व त्या संबंधातून निर्माण होणारे ताण-तणाव “पेरणी” सारख्या कथासंग्रहातून चित्रित केले. महादेव मोरे यांचे कथाविश्व पूर्वसुरीच्या ग्रामीण कथालेखापेक्षा वेगळी आहे. निपाणीच्या आसपासचे तंबाखूच्या धंद्यातले कामगार, टॅक्सी, ट्रक वरील ड्रायव्हर, क्लीनर, मालक, एजंट, वेश्या, डोंबारी अशा कितीतरी उपेक्षितांच्या आयुष्याची कर्मकहाणी मराठी कथेत महादेव मोरे यांनी प्रथम आणली.

**ग्रामीण कादंबरी:**

कादंबरीचे स्वरूप हे कथात्मक गद्याचे दीर्घ रूप असते. कादंबरीचा पैलू व्यापक स्वरूपाचा असतो. वातावरण हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे. निवेदनावर व भाषाशैलीवर कादंबरीचे यश-अपयश अवलंबून असते. आनंद यादव, नागनाथ कोतापल्ले, रा. रं. बोराडे, व्यंकटेश माडगूळकर, ना. धो. महानोर, आनंद पाटील, उद्धव शेळके, श्री. ना. पेंडसे, शंकर पाटील यांसारख्या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांतून समकालीन ग्रामीण वास्तवाचा उत्कट आविष्कार होताना आपल्याला

दिसून येतो. रा. रं. बोराडे यांच्या “पाचोळा” मधील पार्वती तसेच उद्धव शेळके यांच्या “धग” कादंबरीतील कौतिक यांचा जसा जीवन संघर्ष लेखकांनी वास्तव रूपात साकारलेला आहे, अगदी त्याच पद्धतीने कृष्णात खोत यांनी “गावठाण” कादंबरीतून आनंदी नावाच्या स्त्रीची जीवन संघर्षाची कहाणी संवेदनशील मनातून साकारली आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्या “बनगरवाडी” या कादंबरीमध्ये धनगर वाड्यातील लोकांचे वास्तविक जीवन, दुष्काळ, सुगी, लोकांच्या समजुती, दैवत यांचे चित्रण कादंबरीत आढळते. आनंद यादव यांच्या “नांगरणी, झोंबी” अशा आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांतून समाज जीवनाचे वास्तव चित्रण आले आहे. समाजात असणाऱ्या श्रद्धा, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, अज्ञान, अडाणीपणा यांचे चित्रण प्रामुख्याने यात येते.

**सारांश:**

मराठी ग्रामीण साहित्य प्रकारातून ग्रामजीवनातील बोलीभाषा, परंपरेवर असलेली त्यांची श्रद्धा आणि ती श्रद्धा जपत असलेले तेथील व्यक्ती दर्शन, निरागसता प्रकर्षाने जाणवते. बऱ्याच ग्रामीण साहित्यामध्ये स्वतः अनुभवलेले, किंवा त्या समाजात राहून जवळून पाहिलेल्या वास्तविक घडामोडी दिसून येतात. बदलत्या काळानुसार आधुनिकीकरणामुळे अलीकडच्या ग्रामीण साहित्यात शब्द, भाषा, बोली थोडी बदललेली दिसते, यामुळे खेडेगावातील संस्कृती, रूढी, परंपरा, समजुती, मानसिकता नवा पोशाख परिधान केलेली दिसते.

**निष्कर्ष:**

ग्रामीण साहित्य साधे, प्रांजळ व वास्तवदर्शी असते. शहरी साहित्याप्रमाणे कृत्रिमता नसून थेट जीवन अनुभवातून उमटलेली भाषा, बोलीभाषा आणि कथनशैली यात दिसते. संघर्ष, दारिद्र्य, अंधश्रद्धा, अन्याय तसेच निसर्गातील सौंदर्य यांचे चित्रण आढळते. ग्रामीण साहित्य हे केवळ ग्रामीण जीवनाचे चित्रण नसून सामाजिक जाणीव निर्माण करणारे साधन ठरते. ग्रामीण संस्कृतीत सकारात्मक मूल्य टिकवून ठेवत बदलाची गरजही अधोरेखित केली जाते. ग्रामीण साहित्य आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध अतूट आहे. साहित्य हे संस्कृतीचे जतन व अभिव्यक्ती करते तर संस्कृती साहित्याला आशय देते. ग्रामीण साहित्य हे भारतीय साहित्यातील एक सशक्त प्रवाह असून त्यातून खेड्यांचा आत्मा, संस्कृतीचे

मर्म आणि बदलते वास्तव दोन्हीही प्रकट होते, म्हणूनच ग्रामीण साहित्य केवळ साहित्यिक मूल्यांसाठीच नव्हे तर सांस्कृतिक अध्ययनासाठी ही महत्त्वाचे मानले जाते.

**संदर्भ ग्रंथ:**

1. बदलते मराठी साहित्य व संस्कृती – प्रा. विलास रणसुबे, श्रमिक प्रकाशन, कोल्हापूर, २०१३, पृष्ठ २१.
2. ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास - चंद्रकुमार नलगे, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, ऑगस्ट २०१३, पृष्ठ ५२.

**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.